दैनिक महाराष्ट्र
www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २४८ || शुक्रवार २३ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## गंगापूर शहरातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा बेकायदेशीर वाहने उभी वाहतूक पोलीस प्रशासनाचा दुर्लक्ष

गंगापूर प्रतिनिधी २२ ऑगस्ट रोजी

गंगापूर शहरातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा बेकायदेशीर वाहने रस्त्यावर उभे असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावर वाहने बेकायदेशीर रस्त्याच्या कडेला उभे असल्यामुळे रहदारीला कोंडी निर्माण होत आहे. वाहतूक पोलीस प्रशासनाचा या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे. गंगापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रस्त्याच्या कडेला बेकायदेशीर वहाणे उभ्या असल्यामुळे तसेच दोन चाकी वाहने रस्त्याच्या कडेला बेकायदेशीर उभ्या करून नागरिकांची खरेदी कडे वाटचाल असल्यामुळे तासंतास या रस्त्यावर वाहने उभी राहत असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



वाहतूक पोलीस प्रशासनाने या प्रकरणाकडे लक्ष घालावे व बेकायदेशीर वाहने उभे करणाऱ्या वाहनधारकांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिकाकडून केली जात आहे. गंगापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठ्या जड वाहनास वळण घेण्यास खूप मोठी अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाहतूक पोलीस प्रशासन रस्त्याच्या कडेला बेकायदेशीर व बेशिस्त वाहने उभे करणाऱ्या वर कारवाई करणार का असा प्रश्न या ठिकाणी सर्व सामान्य नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला आहे,

## कार्यशाळेतील वक्त्यांचा सूर

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर भंडारा

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या प्रेरणेतून दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ एक दिवसीय कार्यशाळा राबविण्यात आली. दिव्यांगाप्रती संवदेनशीलतेने काम करावे असा सामायिक सूर या कार्यशाळेत उमटला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर रणदिवे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनिषा कुरसुंग, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प समन्वयक अभिजीत राऊत, जिल्हा नियोजन अधिकारी .बोरकर, दिव्यांग कायदे तज्ञ डॉ. विनोद आसुदानी, आम्ही आमच्या आरोग्यासाठी या संस्थेच्या सदस्य संगीता तुमाडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.जिल्हाधिकारी .कुंभेजकर दिव्यांगाना मुलभुत सुविधा पुरवणे तसेच त्यांच्यासाठीचा निधीचा योग्य विनीयोग करण्याचे सांगितले तसेच ५ टक्के दिव्यांग कल्याण योजनेअंतर्गत



व शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत मार्गदर्शन केले. दिव्यांग कायदे तज्ञ श्री. आसुदानी यांनी दिव्यांगाना दया नको, अधिकार द्या. सामान्य जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले रोजगार, शिक्षण, प्रशिक्षण देण्याचे आवाहन केले. तर अधिका-यांनी दिव्यांगाशी संवेदनेने काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

दिव्यांगाच्या जीवनावर आधारीत श्रीकांत चित्रपटातील अनेक प्रसंग व कविता तसेच कायद्यातील तरतुदींवर त्यांनी उत्तम पध्दतीने मार्गदर्शन केले. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प समन्वयक अभिजीत राऊत यांनी दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ मधील कायदे व अधिकार संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. त्यासोबतच शासनाच्या दिव्यांग व्यक्तींसाठी असलेले विविध कायदे व धोरणांसंदर्भात सविस्तर माहिती सांगितली.या कार्यशाळेला सर्व विभागप्रमुख कार्यशाळेचे प्रास्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी मनिषा कुरसुंगे यांनी केले.

## सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता राज्य शासनातर्फे राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन पाच लाख रुपयाचे प्रथम पारितोषिक

### अर्ज करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन ; ३१ऑगस्ट अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर भंडारा,

महाराष्ट्र शासनाच्या पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२४आहे. संपूर्ण भरलेला अर्जmahotsav.plda@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवणे आवश्यक आहे. सदर स्पर्धा नि:शुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे याविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये,



पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. ङ्ङ७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात जिल्हाधिकारी कार्यालयाने गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील.ङ्ङनिवड समिती प्रत्यक्ष उत्सवस्थळी भेट देतील तसेच मंडळाकडून व्हिडीओग्राफी व कागदपत्रे जमा करुन घेतील. जिल्हास्तरीय समितीकडून प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत अभिप्रायासह गुणांकन करण्यात येईल. सदर समिती मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे या ४ जिल्ह्यातून प्रत्येकी ३ व अन्य जिल्ह्यातून प्रत्येकी १ सर्वोत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची शिफारस करुन त्यांची नावे सर्व कागदपत्र व व्हिडीओसह राज्यस्तरीय निवड समितीकडे देण्यासाठी जिल्ह्याधिकाऱ्यांमार्फत संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्याकडे सादर करतील.ङ्ङराज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

## आंदोलकांवर चार गुन्हे, ७२ जण अटकेत

बदलापूर: बदलापुरात मंगळवारी झालेल्या आंदोलनानंतर आंदोलकांवर चार वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले



आहेत. स्थानिक पोलीस ठाण्यांमध्ये तीन तर रेल्वे पोलिसांनी दाखल केलेल्या एका गुन्ह्यात एकूण ७२ जणांना अटक करण्यात आली आहे.

दरम्यान, बदलापूर पूर्व येथील पोलीस ठाण्यात बुधवारी अनेक राजकीय नेत्यांनी घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी आणि पोलिसांशी संवाद साधण्यासाठी हजेरी लावली. त्यामुळे त्यांचीच जास्त गर्दी दिसून आली.

या सर्वांना कल्याणच्या आधारवाडी कारागृहात रवाना करण्यात आले. या सर्व आरोपींचे वकीलपत्र उल्हासनगर तालुका वकील संघटनेने घेतले आहे. दरम्यान बुधवारी बदलापूर शहरात तणावपूर्ण शांतता होती.घटनास्थळी असलेले आंदोलक आणि सीसीटीव्ही तसेच उपलब्ध चित्रणांद्वारे ७२ आंदोलकांना अटक करण्यात आली होती. बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात दोन तर पश्चिम पोलीस ठाण्यात एक आणि रेल्वे पोलिसांनी दाखल केलेला एक असे चार गुन्हे या आंदोलनाप्रकरणी दाखल करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.यात बदलापूर पोलिसांनी ४० तर रेल्वे पोलिसांनी ३२ आरोपींना न्यायालयात हजर केले. या आरोपींची रवानगी आधारवाडी तुरुंगात करण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

## सामाजिक कार्यकर्ते श्री तुळशीराम सानप यांच्या प्रयत्नाला यश !

दैनिक सूर्योदय

(अहमदनगर प्रतिनिधी

दिं २३/०८/२०२४)

आजरोजी पाथर्डी तालुक्यातील जवळपास २५ गावांना तसेच शेवगाव तालुक्यातील जवळपास २५ गावांना मुळा धरणाचे पाणी शेतीसाठी कालव्यामार्फत मिळत असून जायकवाडी धरणातून शेवगाव तालुक्यातील जवळपास २५ गावांना शेतीसाठी पाणी पाईपलाईन मार्फत मिळत आहे.ङ्गआजरोजी पाथर्डी - शेवगाव तालुक्यात जवळपास एकूण २५२ गावे आहेत. मुळा धरणाची पाणी साठवण क्षमता ही २६ टीएमसी असून जायकवाडी धरणाची पाणी साठवण क्षमता १०३टीएमसी आहे. ङ्गपश्चिम वाहिनीचे पाणी





मुळा व जायकवाडी धरणाच्या प्रवाहात सोडून पाथर्डी -शेवगाव तालुक्यातील गावांच्या शेतीसाठी पाणी पाईपलाईन मार्फत अथवा कालव्यामार्फत मार्फत देण्याबाबतचे मागणी निवेदन सामाजिक कार्यकर्ते श्री तुळशीराम अंबादास सानप राहणार कुत्तरवाडी तालुका पाथर्डी जिल्हा अहमदनगर यांनी दिनांक १/७/२०२४ रोजी मा. ना. श्री एकनाथराव शिंदे साहेब मुख्यमंत्री तसेच मा. ना.श्री देवेंद्र फडवणीस साहेब उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री यांना दिले होते. याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी बैठक आयोजित करावी असे आदेश मा. प्रधान सचिव जलसंपदा यांना दिले आहेत. त्यानुसार बैठक आयोजित केली जाणार आहे. बैठक आयोजित करणे बाबत जलसंपदा विभाग यांनी अहवाल मागितलेला आहे. आजरोजी पाथर्डी तालुक्यातील मिरी जिल्हा परिषद गट तसेच शेवगाव तालुक्यातील लाडजळगाव, बोधेगाव, जिल्हा परिषद गटातील एकूण ५६ गावांच्या शेतीसाठी पाणी पाईपलाईन मार्फत देणेबाबतचा कार्यारंभ आदेश पारित करण्यात आलेला असून याबाबत लवकरच उद्घाटन होणार आहे . त्यानंतर पाथर्डी -शेवगाव तालुक्यातील राहिलेल्या गावांच्या शेतीसाठी पाणी पाईपलाईन मार्फत अथवा कालव्यामार्फत देणेबाबत बैठक आयोजित केली जाणार आहे. सदर बैठकीमध्ये अंदाजपत्रक सर्वेक्षण याबाबत कार्यवाही केली जाणार आहे.येत्या पाच वर्षांमध्ये पाथर्डी- शेवगाव तालुक्यातील राहिलेल्या गावांच्या शेतीसाठी पाणी पाईपलाईन मार्फत अथवा कालव्यामार्फत मिळणार आहे.ङ्ग पाथर्डी -शेवगाव तालुक्यातील गावांच्या शेतीसाठी पाणी मिळाल्यानंतर दोन्ही तालुक्यातील दुष्काळ कायमचा नष्ट होऊन शेती बारामाही बागायत होणार आहे. त्याचप्रमाणे दोन्ही तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना होऊन सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या मिळणार आहेत. पश्चिम वाहिनीचे जवळपास १०३ टीएमसी पाणी मुळा व जायकवाडी धरणाच्या प्रवाहात येणार आहे. दोन्ही तालुक्यातील शिल्लक राहिलेल्या गावांची शेती बारामाही बागायत करण्यासाठी जवळपास १० टीएमसी पाण्याची गरज आहे.ङ्गसामाजिक कार्यकर्ते श्री तुळशीराम सानप तसेच दोन्ही तालुक्यातील नागरिकांच्या वतीने शासनास विनंती आहे की, लवकरात लवकर बैठक आयोजित करून शेतीसाठी पाणी पाईपलाईन मार्फत अथवा कालव्यामार्फत देणेबाबत कार्यवाही करावी.ङ्गसामाजिक कार्यकर्ते श्री तुळशीराम सानप यांच्या पाठपुराव्याला यश आले असून अहमदनगर जिल्ह्यातील सर्व शेतकरी तसेच ग्रामस्थ त्यांचे कडून सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम सानप यांचे कौतुक केले जात आहे.

# डोंबिवलीतील कोष्टी समाज सेवा मंडळाचे३६वे वार्षिक स्नेहसंमेलन व सर्व साधारण सभा उत्साहात संपन्न.

डोंबिवली(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)-स्नेहबंधनाचा उत्साही समारंभ म्हणजे कोष्टी समाज सेवा मंडळाचे३६वार्षिक स्नेहसंमेलन.गेली कीत्येक वर्ष कोष्टी समाज बांधव गुण्यागोविंदाने डोंबिवली येथे रहात आहेत.कोष्टी समाज सेवा मंडळ३६वर्ष कार्यरत आहे.त्याच अनुषंगाने नुकताच मंडळाची सर्व साधारण सभा व वार्षिक स्नेहसंमेलन शुभमंगल कार्यालय,रेल्वे स्टेशन जवळ,डोंबिवली(पुर्व)येथे उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमाची सुरूवात चौंडेश्वरी देवीच्या प्रतिमेची पुजा व आरती करुन झाली.कार्यक्रमास सौरभ मराठे(सी.ए.)यांनी धर्मादाय संस्थेने कसे काम करावे,देणगी देणा-यांनी८०जी अंतर्गत कसा उपयोग करावा तसेच इनकम टॅक्स संदर्भात विशेष मार्गदर्शन केले.प्रमुख पाहुणे ॲड.सचिन देवांग यांनी कोष्टी समाजाने कशी प्रगती करावी आणि कोष्टी समाजासाठी मार्गदर्शक तत्वे




या संदर्भात बहुमोल मार्गदर्शन केले.ॲड.सचिन देवांग हे अनेक नामांकीत शैक्षणिक व धर्मादाय संस्थांचे कायदेशीर सल्लागार आहेत.त्यांनी मंडळास पाच हजार रुपयांची देणगी दिली.त्यांनी मंडळास गरज लागल्यास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे वचन दिले.विशेष अतिथी आर्किटेक्ट सौ.अनुजा वाव्हळ यांनी वास्तुशास्त्र,अंकशास्त्र,रेकी इत्यादी बाबत सविस्तर माहिती सांगितली.मुलांमध्ये पॉझिटीव्ह एटीट्युट रुजवला पाहिजे असे आग्रहाने सांगितले.याप्रसंगी अनिल वाघ यांनी दोन सुश्राव्य गाणी सादर केली.तसेच मुला-मुलींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.मंडळाच्या अध्यक्षा सौ.अनिता वाघावकर यांनी समाज बांधवांनी अशा स्नेहसंमेलनात जास्त प्रमाणात उपस्थित रहावे असे आवाहन केले.तरुण पिढीने सहभाग घ्यावा,तरच मंडळ पुढे व्यवस्थित कार्यरत राहिल व आपल्या समाजातील तरुण मंडळींना समाजाबद्दल ओढ निर्माण होईल हे आवर्जून सांगितले.अहवाल व मागिल सभेचे इतिवृत्त वाचन सचिव सौ.जयश्री रोकडे यांनी केले.प्रमुख पाहुण्यांची ओळख दत्ता कडुलकर यांनी करुन दिली.विद्यार्थी गुणगौरव समारंभ शशिकला दिवटे यांनी सादर केला.सुत्रसंचालन व प्रास्ताविक मिलींद रोकडे यांनी केले.आभार राजन बुचडे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.शिल्पा वाव्हळ,सौ.कविता तारळकर,प्रशांत खोचे आदींनी विशेष परिश्रम घेतले.मंडळाकडुन उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातवैज्ञानिक दृष्टिकोन आणि अंधश्रद्धा निर्मुलन, पर व्याख्यान पार पडले.

देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय येथे दिनांक २२/०८/२०२४ रोजी विद्यालयाचे प्राचार्य. श्री. रामचंद्र कापसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.




यामध्ये व्याख्याते म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष श्री. विजयजी पोटफोडे यांचे लोकांच्या मनात अंधश्रध्ये विषयी असणारी भीती वैज्ञानिक दृष्टिकोनातून, वेगवेगळ्या उदाहरणाच्या सहाय्याने दूर करण्याचा प्रयत्न केला.विद्यार्थी वर्गाने कोणत्याही गोष्टीचा विचार हा अंधश्रध्येच्या माध्यमातून न करता त्या गोष्टीची वैज्ञानिक बाजू समजून घ्यावी. असे आवाहन केले.

शेवटी विद्यालयाचे शिक्षक श्री. यादव सर यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# मातृ संस्थेच्या कुणबी समाजोन्नती संघ मुंबई अध्यक्षपदी माझी वर्णी हे माझे भाग्य- अनिल नवगणे

तळा कृष्णा भोसले.

मातृ संस्थेच्या कुणबी समाजोन्नती संघ मुंबई अधक्षपदी वर्णी लागणे हे माझे भाग्य समजतो. तुम्ही तळा शाखेनेमाझा केलेल्या सत्काराने मी कृतज्ञ झालो असे प्रतिपादन कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष अनिल नवगणे यांनी केले आहे. तळा ग्रामीण शाखेने कै. अशोक शेठ लोखंडे सभागृह तळा येथे आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलताना त्यांनी वरील विधान केले आहे. या कार्यक्रमाला तालुका अध्यक्ष नामदेव काप, समाजनेते रवींद्र मांडवकर, समाजनेते जनार्दन पांढरे, तालुका उपाध्यक्ष तुकाराम पाटेकर, पांडुरंग कळंबे, सचिन कदम, यशवंत मोढें,संदिप मोडक,




त्याचबरोबर गाव प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी संघाच्या शतकोत्तर प्रगतीचा आढावा घेत, समाजातील विदयार्थी शिष्यवृत्ती, मुलुंड येथील विद्यार्थी वसतिगृह, ङ्गआजीवन सदस्य नोंदणी याविषयी व्यापक माहिती दिली. ङ्गसमाजाच्या हितासाठी जे जे करणे शक्य आहे ते करण्यासाठी आपण अहोरात्र प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. यावेळी रवींद्र मांडवकर, भानुदास मंचेकर, कृष्णा भोसले, परशुराम वंरडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# तोपर्यंत तुम्ही गांभीर्याने घेणारच नाही का? बलात्कार प्रकरणावरून उच्च न्यायालयाने पोलिसांना फटकारले

मुंबई : अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्काराच्या प्रकरणाच्या तपासातील उणिवा लक्षात घेता न्या. अजय गडकरी आणि न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठाने पोलिसांना चांगलेच फटकारले. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करण्यात आल्यानंतर ती गर्भवती झाली. साडेचार महिन्यांनी तिचा गर्भपात करण्यात आला आणि या संदर्भातील पुरावे मुंबईतील एका खासगी रुग्णालयाने नष्ट केले. बदलापूरमध्ये दोन चिमुरड्यांवर एका सफाई कामगाराने लैंगिक अत्याचार केल्याच्या निषेधार्थ करण्यात आलेल्या रेल रोको आंदोलनाचा हवाला




देत खंडपीठाने प्रश्न केला की, लोकांनी आवाज उठवल्यानंतरच महाराष्ट्र पोलिस महिला आणि मुलांवरील गुन्ह्यांची चौकशी करणार का? जोपर्यंत लोक विरोध करत नाहीत तोपर्यंत तुमचा विभाग तपास करणार नाही का? लोकांनी आंदोलन केल्याशिवाय महिलांवरील महिलांवरील गुन्ह्यांची गांभीर्याने दखल घेणार नाही, असा संदेश महाराष्ट्र राज्य देऊ पाहत आहे का? दररोज आम्ही कोणत्या ना कोणत्या बलात्काराच्या किंवा पॉक्सोच्या प्रकरणाची सुनावणी घेत आहोत,'' असे संतप्त झालेल्या न्या. गडकरी यांनी म्हटले.न्यायालयाने पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौघुले-श्रृंगी यांना कामकाजाच्या सकाळच्या सत्रात न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले होते. परंतु, सरकारी वकील आशिष सातपुते यांनी ठाणे जिल्ह्यातील नालासोपारा येथील कायदा व सुव्यवस्था हाताळण्यात व्यस्त असल्याचे न्यायालयाला सांगितले. त्यांचा या उत्तरानंतर न्यायालयाने वरील

टिप्पणी केली. महिलांविरोधातील गंभीर गुन्ह्यांची किमान चार प्रकरणे आमच्या समोर येतात ज्यांची योग्य चौकशी होत नाही, हे दयनीय आहे. तुमच्याकडे विशेष अधिकारी किंवा महिला अधिकारी नाहीत का? फक्त कॉन्स्टेबल आणि हेड कॉन्स्टेबलनाच प्रकरणे तपासायला का देता? अशा प्रकरणांमध्ये पोलीस संवेदनशील का नाहीत? असे खंडपीठाने म्हटले. जर राज्य सरकार या प्रकरणांचा योग्य तपास करू शकत नसेल, तर त्यांनी यापुढे अशा गंभीर प्रकरणांची चौकशी करणार नाही, अशी सार्वजनिक घोषणा करावी, अशा शब्दांत न्यायालयाने सरकारला सुनावले. यापुढे महिला आणि बालकांवरील गुन्ह्यांची चौकशी योग्य पद्धतीने केली जाणार नाही, असे महाराष्ट्र राज्य का जाहीर करत नाही? किंवा केल्यास ती गांभीर्याने केली जाणार नाही, अशी जाहीर घोषणा तुम्ही करावी, असे न्यायालयाने म्हटले. बलात्कार झालेल्या एका अल्पवयीन मुलीने घाईघाईने गर्भपात केला आणि याबाबत पोलिसांना माहीत कसे नाही? आम्ही न्यायालयीन दखल घेतली नसती तर हे प्रकरण उघडकीस आले नसते. हे सर्व केवळ पोक्सो प्रकरणातील वाचविण्यासाठी आरोपींना करण्यासाठी केले जात असल्याचे का नोंदवू नये ? आरोपींविरुद्ध बलात्काराचा दाखल करणाऱ्या अल्पवयीन मुलीच्या संमतीने साडेचार महिन्यांचा गर्भ संपुष्टात आणण्याचे काम रुग्णालय कसे करू शकते? आणि सर्वात कहर म्हणजे बलात्कार पीडितेचा गर्भपात करताना डीएनए सॅम्पलिंगच्या उद्देशाने टिश्यू जतन करणे आवश्यक असते असे आमचे स्पष्ट आदेश असूनही हॉस्पिटल पुरावे कसे नष्ट करते? असे सवाल न्यायालयाने महिला अधिकाऱ्याला केले.

अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करणाऱ्या एका आरोपीने तिच्याच संमतीने गुन्हा रद्द करण्यासाठी याचिका दाखल केल्याने न्यायालयाने संताप व्यक्त केला.**बदलापूर प्रकरणाची दखल**

**बदलापूरच्या दोन चिमुरडींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेत स्वयंप्रेरणेने याचिका दाखल करून घेतली आहे. या याचिकेवर गुरुवारी न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे सुनावणी होणार आहे.**

# पूर्वलक्ष्यी पंचाईत!

कर आकारण्याचा अधिकार राज्यांना दिला ते ठीक; पण निदान हा कर इतिहासकालापासून तरी वसूल करू देऊ नका इतकीच त्यांची मागणी होती. सर्वोच्च न्यायालयाने तीही फेटाळली. याचे अनेक गंभीर आणि दूरगामी परिणाम संभवतात. त्याची चर्चा करण्याआधी जे झाले त्याची संक्षिप्त उजळणी आवश्यक ठरते

सुमारे पाव शतकाहून अधिक वर्षे न्यायप्रविष्ट असलेल्या या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ जणांच्या खंडपीठाने ८-१ अशा बहुमताचा निकाल दिला. पेट्रोलजन्य घटक वगळता कोळसा, लोह, लोहखनिज, तांबे, बॉक्साईट आदी खनिजांस हा निकाल लागू होतो. मुळात हा खटला 'मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथोरिटी विरुद्ध स्टील ऑथोरिटी ऑफ इंडिया' या नावे ओळखला जातो. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये उतरली आणि या सर्वांनी मिळून केंद्राच्या अधिकारांस आव्हान दिले. ही सर्व राज्ये खनिजसंपन्न आहेत; हे ओघाने आलेच. ही राज्ये 'स्वामित्व मूल्य' (रॉयल्टी) आकारून खनिजे काढण्याची कंत्राटे सरकारी वा खासगी कंपन्यांस देतात; हा प्रघात. जेव्हा काही राज्यांनी या स्वामित्व मूल्याखेरीज खनिकर्म उद्योगावर आणखी कर आकारला त्या वेळी त्यात बदलाचा प्रयत्न झाला. त्यास न्यायालयात आव्हान दिले गेले आणि दोन स्वतंत्र टप्प्यांवर सात आणि पाच सदस्यांच्या खंडपीठाने दोन स्वतंत्र निकाल दिले. यातील एका निकालात 'स्वामित्व मूल्य' म्हणजेच कर असा निष्कर्ष होता, तर दुसऱ्या पीठाने कर आणि स्वामित्व मूल्य हे दोन भिन्न मुद्दे असल्याचे सांगितले. अशी मतभिन्नता झाल्याने अंतिम निवाड्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नऊ न्यायाधीशांचे स्वतंत्र पीठ यासाठी स्थापन केले. दस्तूरखुद्द सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासह हृषीकेश रॉय, अभय ओक, जे. बी. पारडीवाला, मनोज मिश्रा, उज्जल भुयान, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीहा तसेच न्या. बी. व्ही. नागरत्ना यांचा यात समावेश होता. यातील आठ न्यायाधीशांचे ''स्वामित्व धन आणि कर हे दोन भिन्न मुद्दे आहेत आणि राज्यांना स्वामित्व धनाखेरीज स्वतंत्र कर आकारणी करण्याचा अधिकार आहे'' यावर एकमत झाले आणि न्या. नागरत्ना यांनी स्वतंत्रपणे आठ मुद्द्यांद्वारे आपली मतभिन्नता नोंदवली. त्यांच्या मते ''जमीन हा विषय जरी राज्यांच्या अखत्यारीत असला तरी त्या जमिनींखालील खनिजे आणि मूलद्रव्यांवर केंद्र सरकारचा हक्क असतो; सबब राज्यांना त्यावर कर आकारण्याचा हक्क नाही.'' सर्वोच्च न्यायालयातील आठ न्यायमूर्तींनी हा मुद्दा नाकारला. स्वामित्व मूल्य आणि कर या दोन मुदलात स्वतंत्र बाबी आहेत, स्वामित्व मूल्य म्हणजे कर नाही आणि जमीन हा मुद्दा घटनेनुसार राज्यांच्या अखत्यारीत असल्याने त्या जमिनीतून निघणाऱ्या खनिजावर राज्यांस अधिकार नाही असे म्हणता येणार नाही, असे न्या. चंद्रचूड लिखित बहुमताच्या निकालात स्पष्ट केले गेले. आता प्रश्न या निकालाच्या पूर्वलक्ष्यी प्रभावाचा.

त्याबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाशी पूर्णांशाने सहमत होणे अवघड. यातून खाण कंपन्यांस किमान दोन लाख कोटी रुपये विविध राज्यांच्या तिजोरीत भरावे लागतील. या खाण कंपन्यांची बाजू घ्यावी असे काहीही नाही, हे खरे. तेव्हा त्यांच्या पर्यावरण-दुष्ट पोटास चिमटा बसत असेल तर त्याचा सामान्यजनांस आनंदच व्हायला हवा. परंतु तरीही त्यांना तुम्ही काही वर्षांपूर्वी जे केले त्यावर तेव्हापासून आजतागायत कर आकारणे अन्यायाचे ठरते. कोणतीही वसुली ही उत्तरलक्ष्यीच असायला हवी. या संदर्भात एक बरे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने राज्यांवर पूर्वलक्ष्यी करवसुली करताना विलंब शुल्क, कर रकमेवर व्याज आदी आकारण्यास सक्त मनाई केलेली आहे. मूळ रक्कम तेवढी मागेपासून आकारली जाईल. तसेच या पूर्वलक्ष्यी कराची वसुली एका टप्प्यात केली जाणार नाही. तरीही ही रक्कम मोठी आहे. झारखंड या एकट्या राज्यानेच सुमारे दीड लाख कोटी रुपये वसुलीची अपेक्षा यावर व्यक्त केली. दुसरे असे की पूर्वलक्ष्यी वसुलीच्या आपल्या आठवणी. व्होडाफोन प्रकरणात असा पूर्वलक्ष्यी प्रभावाने करवसुलीचा निर्णय तत्कालीन अर्थमंत्री प्रणब मुखर्जी यांनी (२०१२) घेतला. ते प्रकरण आंतरराष्ट्रीय पातळीवर अंगाशी आले. मुद्दा होता व्होडाफोनने दुसरी एस्सार टेलिफोन या कंपनीवर स्वामित्व मिळवले त्या व्यवहाराचा. यावर 'कॅपिटल गेन्स टॅक्स' पूर्वलक्ष्यी प्रभावाने दिला जावा असे अर्थमंत्री प्रणबदांस वाटले. या काँग्रेसी अर्थमंत्र्याचे एका विशेष उद्योगघराण्याशी असलेले मधुर संबंध यामागे किती आणि प्रामाणिक कर गरज किती या प्रश्नाच्या उत्तरात न जाताही त्याची आठवण उद्योगविश्वास आजही अस्वस्थ करते. हे जू मानेवरून उतरण्यास जवळपास नऊ वर्षे गेली. तेव्हा प्रश्न असा की हा इतिहास असतानाही सर्वोच्च न्यायालयाने खाणप्रकरणी अशी मुभा का दिली? तशी ती दिली नसती आणि सर्व करवसुली उत्तरलक्ष्यी प्रभावाने ठेवली असती तर अधिक गुंता झाला असता, असे यावर सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्टीकरण. ते अयोग्य नाही. आपला ताजा निर्णय पूर्वलक्ष्यी प्रभावाने अमलात आणला नाही तर याआधी राज्या-राज्यांनी जे कर/स्वामित्व मूल्य खाण कंपन्यांस आकारले ते सर्व बेकायदा ठरते. ते पूर्वलक्ष्यी प्रभावाने नियमित करणे गरजेचे होते. अन्यथा ही रक्कम कारखान्यांकडे परत देण्याची वेळ राज्य सरकारांवर आली असती. तेव्हा हे इतिहासातील उलाढाल वैध ठरवण्यासाठी नव्या निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्ष्यी प्रभावाने करवणे आवश्यक होते, असे सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे. हा युक्तिवाद अतार्किक म्हणता येणार नाही, हे खरे. पण त्यामुळे कंपन्यांच्या अडचणी मोठ्या प्रमाणावर वाढणार हेही खरे. ही 'पूर्वलक्ष्यी पंचाईत' सोडवायची कशी याचा मार्गही सर्वोच्च न्यायालयाने दाखवावा. राज्यांची धन होताना अन्य कोणावर अन्यायाने भिकेस लागण्याची वेळ येणे योग्य नव्हे.

# अंगणवाडी सेविकांना पाच हजारांची वाढ?

मुंबई: ग्रामीण भागातील अनेक शासकीय कामांना हातभार लावणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना अनुक्रमे पाच हजार व तीन हजार रुपये मानधन वाढ देण्याचा प्रस्ताव महिला विकास विभागाकडून वित्त विभागाला सादर करण्यात आला आहे. १२ ऑगस्टपासून राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस मुंबईत हुतात्मा चौकात आंदोलन करीत आहेत. राज्यात एक लाख २० हजार अंगणवाडी सेविका व ६० हजार मदतनीस आहेत. त्यांना १२ हजार रुपये मानधन आहे. मदतनीसांना ८ हजार रुपये मानधन आहे. त्यांच्या मानधनात वाढ व्हावी अशी गेली अनेक वर्षांची मागणी आहे. आशा सेविकांच्या मानधन दरमहा १५ हजार करण्यात आल्याने अंगणवाडी सेविकांच्या आंदोलनात बळ आले आहे. अंगणवाडी सेविकांना पाच हजार तर मदतनीस यांना तीन हजार रुपये वाढ देण्यात यावी असा प्रस्ताव महिला विकास विभागाने वित्त विभागाला दिला आहे.



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शुक्रवार २३ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल ची तालुका स्तरीय खो-खो स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी



मंडणगड प्रतिनिधी –ङ्ग मंडणगड तालुका तालुका विकास मंडळ संचलित, पणदेरी पेवे पंचक्रोशी हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी तालुका स्तरीय १७ वर्ष वयोगट ( मुले) खो - खो स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा विजय प्राप्त करुन तालुका स्तरावर आपला खो - खो स्पर्धेतील अजिंक्यपदाचा दबदबा कायम ठेवला आहे. सेमी फायनल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल सारख्या मातब्बर संघाला चारी मुंड्या चीत करत फायनल मध्ये दिमाखात प्रवेश केला व फायनल मध्ये आंबडवे हायस्कूलचा दणदणीत पराभव करत सलग तिसऱ्यांदा विजयाला गवसणी घातली. जिल्हा स्तरासाठी हा संघ पात्र ठरला आहे.ङ्ग खो - खो संघाला प्रशालेचे क्रीडा विभाग सांभाळणारे श्री.इंगळे आर. व्ही. यांचे मार्गदर्शन लाभले.ङ्ग प्रशालेच्या या यशाबद्दल संस्था, प्रशालेचे प्र.मुख्याध्यापक , शालेय समिती अध्यक्ष व सदस्य , शाळा व्यवस्थापन समिती, पालक, सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , माजी विद्यार्थी यांच्याकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## पाटपन्हाळे महाविद्यालयात सदभावना दिवस उत्साहात साजरा..!

(कै.राजीव गांधींचा आदर्श ठेवून आचरणात आणला पाहिजे - प्र.प्राचार्य डॉ.देसाई)

आबलोली (संदेश कदम)

गुहागर तालुक्यातील पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटी संचलित पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आय. क्यु. ए. सी. अंतर्गत सांस्कृतिक विभागाच्यावतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद देसाई यांच्या अध्यक्षतेखाली भारताचे माजी पंतप्रधान कै. राजीव गांधी यांची जयंती ‘‘सदभावना दिवस‘‘ म्हणून साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद देसाई यांच्या हस्ते कै.राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमानिमित्त सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. जालिंदर जाधव यांनी सदभावना दिवसाचे महत्व सांगितले. प्राचार्य डॉ. प्रमोद देसाई यांनी कै. राजीव गांधी यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. त्यांचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन ते आचरणात आणावे म्हणजे खऱ्या अर्थाने कै. राजीव गांधी यांचे स्मरण होईल असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . द्वितीय वर्ष कला वर्गातील साहिल आग्रे याने उपस्थित विद्यार्थी व मान्यवर यांना सदभावना दिवसाची शपथ दिली.

सदर कार्यक्रमाला सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. जालिंदर जाधव, डॉ. प्रवीण सनये, प्रा. कांचन कदम, डॉ. प्रसाद भागवत, ग्रंथपाल श्री. धनंजय गुरव, श्री. परशुराम चव्हाण व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते .सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जालिंदर जाधव यांनी केले .मान्यवर व विद्यार्थी यांच्या सहकार्याबद्दल डॉ. प्रवीण सनये यांनी आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला.

## विलास धाटावकरांची यावर्षी हेट्रिक पूर्ण......तर लिजेंड ट्रॉफीचे मानकरी ठरले मुनाफ गोंडेकर.

अलिबाग प्रतिनिधी

राजेश बाष्टे:- : कै.संजय म्हात्रे स्मुर्ती चषक २०२४, रेवदंडा-चौल ग्रामस्थ मंडळ आयोजीत मानाच्या नारळ फोडी स्पर्धेचे सलग तिसऱ्या वर्षीच्या विजेतेपदाचे मानकरी विलास धाटावकर ठरले. नारळी पौर्णिमेनिमित्त रेवदंडा आंग्रेनगर येथे भरवण्यात आलेल्या नारळ फोडी स्पर्धेसाठी सालाबादप्रमाणे स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



स्पर्धेचे अध्यक्ष संदेश बेडेकर, मुख्य आयोजक व निवेदक सुहास घोणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा उत्तमरित्या पार पडली तर यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रायगड जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शरद गोंधळी, राजेंद्र नाईक, रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच प्रफुल्ल मोरे, सदस्य संतोष मोरे, मा. सदस्य संदिप खोत, आसिफ गोंडेकर, सलीम गोंडेकर, राहुल गणपत, दिपेश पाटील, रमेश वार्डे आदी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

स्पर्धेमध्ये २४० पेक्षा जास्त नारळ फोडण्यात आले. या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरते ते म्हणजे नारळ या नारळाची किंमत ही १५००/- ते २५००/- असते त्याचे महत्त्व असे की ह्या नारळाची कर्टी ही ४ मिलिमीटर तेवढी तर त्याहून मोठी सुद्धा असते सहजासहजी दुकानावर हे नारळ मिळत नाही. तर मारेकरी आणि नारळ टाकणारा या दोघांची ही स्पर्धेत खूप कसरत असते अनेकदा नारळ फोडी खेळताना दुखापत ही होत असते परंतु स्पर्धक कोणत्याही गोष्टीची परवा न करता तन मन धन अर्पण करून खेळ खेळतात. अनेक दिग्गज व अनुभवी या स्पर्धेत भाग घेतात तर फक्त रेवदंडा, चौल इथूनच नाही तर तालुक्याच्या बाहेरून देखील स्पर्धक सहभाग घेतात. या स्पर्धेत नियमांचे उलंघन न व्हावं यासाठी पंचांचा निर्णय अतिंम मानला जातो.

स्पर्धेत प्रथम क्र. पारितोषिक विलास धाटावकर रेवदंडा यांना मिळाले. दृतिय क्र. पारितोषिक निखिल वारगे रा. दिवेआगर, तृतीय क्र. महेश किर रा. वडवळ, तर चतुर्थ क्र. पारितोषिक देवांग सुडकु रा. थेरोंडा यांनी पटकावले. तसेच पुढच्या वर्षी हि स्पर्धेत आणखीन वाढ होईल अशी माहिती मुख्य आयोजक सुहास घोणे यांनी दिली.

## बहुजन युथ पँथर तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह वलंग येथे भोजन वाटप

पोलादपूर शहर प्रतिनिधी

प्रवीण सोनवणे

७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ . बाबासाहेब आंबेडकर मूलांचे वसतिगृहवलंग ता . महाड येथे बहुजन युथ पँथरचे वतीने विद्यार्थ्यांना भोजन वाटप .ङ्गबहुजन युथ पँथर या संघटनेचे मा. श्री. लवेश साळवी, सभासद मा. श्री. प्रविण सोनावणे, मा. श्री. राकेश साळवी, मा. श्री. प्रदिप साळवी मा. श्री. यश साळवी, सिद्धार्थ सोनावणे व मा. श्री. जितुभाई पवार यांची कन्या कुमारी ख्याती पवार यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक तथा संस्थेचे



राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. भाईसाहेब जाधव साहेब व कोकण प्रदेश अध्यक्ष मा. श्री. जितूभाई पवारसाहेब यांच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह, वलंग या ठिकाणी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून भोजन वाटप करण्यात आलेङ्ग गुरुवार दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी १वा वलंग शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ . बाबासाहेब आंबेडकर वसतिगृहामध्ये या कार्यक्रमासाठी बहुजन युथ पँथर चे राष्ट्रीयअध्यक्ष मा. श्री. भाईसाहेब जाधव हे मुंबई वरून कार्यक्रमास उपस्थित राहिले त्यांचे स्वागत संस्थेचे माजी कार्याध्यक्ष मा. श्री. प्रभाकरजी सागवेकर साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. संघटनेचे कोकण प्रदेश अध्यक्ष मा. श्री. जितुभाई पवार यांचे स्वागत संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री . दिलीपजी साळवी साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले.त्याच प्रमाणे संघटनेचे कोकण प्रदेश सचिव कार्यवाह मा.श्री. कुर्डूनकर सर यांनी केले. ङ्ग या प्रसंगी संघटनेचे राष्ट्रीयअध्यक्ष मा. श्री. भाईसाहेब जाधव यांनी मुलांना मार्गदर्शन केले व ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर वसतिगृहातील मुलांना बहुजन युथ पँथर संघटनेच्या माध्यमातून भोजन दान करण्यात आले. यामध्ये मा. श्री. भाईसाहेब जाधव व मा. श्री. जितुभाई पवार यांनी स्वतः मुलांना भोजन वाटप केले व सर्वांनी सामूहिक भोजन केले. ङ्ग या सर्व कार्यक्रमासाठी बहुजन युथ पँथर संघटनेचे कोकण प्रदेश अध्यक्ष मा. श्री. जितुभाऊ पवार यांनी मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन . श्री. गंगाधर साळवी सर यांनी केले शेवटी मा. श्री. कुर्डूनकर सर यांनी बहूजन युथ पँथरचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांचे डॉ . बाबासाहेब आंबेडकर मूलांचे वसतिगृह आणि वलंग शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या वतीने मन :पूर्वक आभार मानले.

## नाटयरुची कला मंच ठरले विवेक जागर करंडक विजेता

पाली /बेणसे दि. (धम्मशील )डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या ११ व्या स्मृतिदिनानिमीत्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पनवेल शाखेतर्फे आयोजित विवेक जागर करंडक पथनाट्य स्पर्धेत नाट्यरूची कलामंच चेंबूर प्रथम क्रमांकाने विजेते ठरले आहे. ङ्ग तर परिवर्तन नाट्य कला संस्था खोपोली यांनी द्वितीय क्रमांक व कॉलेज ऑफ सोशल वर्क निर्मला निकेतन चर्चगेट यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना सन्मानचिन्ह, रोख रक्कम, पुस्तक प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्पर्धेत अंतिम फेरीत सादरीकरणासाठी २० संघ होते. सर्वांचेच सादरीकरण उत्कृष्ट होते.



डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या २० ऑगस्ट २०१३ रोजी करण्यात आली. त्यांचे विवेकी विचार संपवण्याचा तो प्रयत्न होता. त्याचा निषेध करतानाच समितीने हिंसा के खिलाफ मानवता की ओर हे अभियान सुरू केले. तरुणाईत विवेकी विचारांचा जागर व्हावा म्हणून पनवेल शाखा गेली सहा वर्षे ही पथनाट्य स्पर्धा भरवत आहे. यावर्षी स्पर्धेचा विषय हाताची घडी तोंडावर बोट हा होता. ही स्पर्धा रविवारी (ता. १८) पनवेलच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे पार पडली. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रशांत जोशी, किरण पवार, रसिया पडळकर यांनी काम पाहिले.ङ्ग यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार प्रियांका तुपे या उपस्थित होत्या.

त्यांनी युवकांच्या प्रश्नांवर उपस्थित तरुणाईशी संवाद साधला. स्पर्धेचे उद्घाटन सतीश मोरे (धुडगूस आणि येडा चित्रपटाचे निर्माते) यांच्या हस्ते अभिनव पध्दतीने करण्यात आले. हाताची घडी सोडत अभिव्यक्ती वरची बंधने उठवत हे प्रतीकात्मक उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी महा.अंनिस राज्य महिला कार्यवाह आरती नाईक तसेच राज्य युवा सहभाग कार्यवाह प्रियांका खेडेकर, एपीआय राजन ताटे, जिल्हा कार्याध्यक्ष संदीप गायकवाड हे उपस्थित होते.

-------------

**उत्कृष्ट दिग्दर्शक, लेखक व अभिनेत्यांचा गौरव**

**सर्व सादरीकरणातून उत्कृष्ट दिग्दर्शक किरण बनसोडे , भवन्स कॉलेज गिरगाव, उत्कृष्ठ लेखक जीवन भावल, रामनारायण रुईया कॉलेज व उत्कृष्ठ अभिनेता विशाल पगारे, दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय अकोले यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.**

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सितराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालय: जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )